रविवार, दि. २९ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३२३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ‘वक्फ वाचवा’ परिषदेत ‘जनसैलाब’








**जालना । प्रतिनिधी -** नुकत्याच मंजूर करण्यात आलेल्या वक्फ (सुधारणा) कायद्याविरोधात जनजागृती आणि जनमत तयार करण्याच्या उद्देशाने, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या (IMPLB) ताहाफ्फुज-ए-अवकाफ समितीच्या वतीने जालना येथे शनिवारी, २८ जून रोजी जुन्या जालना ईदगाह मैदानावर भव्य ‘वक्फ वाचवा’ परिषदेत ‘जनसैलाब’ उसळला. मुस्लीम समुदायासह इतर समाजातील नागरिकांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या परिषदेच्यामाध्यमातून उपस्थित मान्यवरांनी वक्फ कायद्यातील दुरुस्त्यांचे परिणाम लोकांसमोर ठेवले. यावेळी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डचे अध्यक्ष खालिद सैफुल्लाह रहमानी, मौलाना फजलुर रहीम मुजद्दिदी, मौलाना उमरैन महफूज रहमानी, खासदार डॉ. कल्याण काळे, इलियास खान फलाही, माजी आमदार कैलास गोरंट्याल, शिवसेना जिल्हा अध्यक्ष भास्कर अंबेकर, अब्दुल हाफिज, मौलाना असगर अली मेहद, मौलाना हलीमुल्लाह कासमी, मौलाना हाफिज मोहम्मद नदीम सिद्दीकी, ॲड. अझहर तांबोळी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

(फोटो - जावेद तंबोली)

## जालन्यात ड्रग्ज व अंमलीपदार्थांची खुलेआम विक्री

# मुलांना ड्रग्सपासून वाचवण्यासाठी सजग पालकत्वाची गरज - ॲड. अश्विनी धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगरमध्ये अलीकडेच टाकण्यात आलेल्या छाप्यामध्ये सव्वा कोटी रुपयांची मॅफेड्रॉन (एम.डी.) ड्रग्ज जप्त करण्यात आली. या बातमीने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली असून, ड्रग्ज व अमली पदार्थ खुलेआम विक्रीस उपलब्ध असल्याचे वास्तव उजेडात आले आहे. हीच परिस्थिती जालना शहरातही असून, अशाप्रसंगी मुलांना ड्रग्सपासून दूर दूर ठेवण्यासाठी सज्ज पालकाची गरज आहे, असे मत बाल न्याय मंडळाच्या सदस्य ड. अश्विनी महेश धन्नावत यांनी व्यक्त केले आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात ड. अश्विनी धन्नावत यांनी म्हटले आहे की, आज शाळा व महाविद्यालयीन वयातील विद्यार्थी सहजपणे ड्रग्ज माफियांच्या जाळ्यात अडकत आहेत. सुरुवातीला हे व्यसन ‘स्टाईल’ म्हणून सुरू होते. मात्र, पुढे जाऊन हेच व्यसन त्यांचे आयुष्यच उद्ध्वस्त करते. काही लहान मुले घरातील ज्येष्ठ नागरिकांचे पैसे चोरून हे पदार्थ खरेदी करत आहेत. ही परिस्थिती खूपच चिंताजनक असून तातडीने उपाययोजना करणे अत्यावश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर इन्नरव्हिल क्लब ऑफ जालना होरायझन, जालना महानगरपालिका आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती मोहिमा राबविल्या जात आहेत. विद्यार्थ्यांना या व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगण्याबरोबरच पालकांनाही



सजग राहण्याचे आवाहन या उपक्रमांतून करण्यात येत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने याच विषयावर स्वतःहून जनहित याचिका दाखल करत गंभीर दखल घेतलेली आहे. या याचिकेत जालना येथील स्थितीचा मुद्दा अधोरेखित झाला असून, येथेही सतर्कतेची गरज असल्याचे मत नोंदविण्यात आले आहे. आवश्यक वाटल्यास आपण स्वतः या याचिकेत पक्षकार म्हणून सहभागी होण्याचा विचार करत असल्याचे ड. अश्विनी धन्नावत यांनी म्हटले आहे.

जर पालकांना आपल्या मुलांच्या वागण्यात अचानक बदल जाणवत असेल, त्यांनी पैसे चोरणे, एकटे राहणे, अचानक चिडचिड करणे किंवा अभ्यासापासून लांब जाणे अशी लक्षणे दिसत असतील, तर त्यांना रागावण्याऐवजी प्रेमाने समजावून घेणे गरजेचे आहे, असे ड. धन्नावत यांनी स्पष्ट केले. अशावेळी पालकांनी घाबरून न जाता तात्काळ उपाययोजना कराव्यात व आवश्यक असल्यास माझ्याशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# रोटरी रेनबोचा जालन्यात साकारतोय प्लास्टिक संकलन व पुनर्वापर प्रकल्प

## शिलालेखचा अनौपचारिक अनावरण सोहळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** प्लास्टिक कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण आणि पुनर्वापर करण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या पुढाकाराने रोटरी फाउंडेशन, यूएसएच्या जागतिक अनुदानातून व रोटरी क्लब ऑफ हाउडेन ( युनायटेड किंगडम) टी.बी. लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशन, सांगली यांच्या सहकार्याने
जालना शहरातील जुन्या एमआयडीसीत एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यात येत असून, या प्रकल्पाच्या शिलान्यासाचे अनौपचारिक अनावरण शुक्रवार दि. २७ जून रोजी हॉटेल सेफ्रॉनच्या सभागृहात प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते आणि युनायटेड किंगडममधील रोटरी क्लब ऑफ हावडनचे ग्रँट लीड डेविड साउथवर्थ यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

व्यासपीठावर ग्लोबल ग्रँटचे जिल्हाप्रमुख डॉ. अनुप करवा, डॉ. पराग नेमाडे (ग्रँट लीड), रोटरी क्लब जालना रेनबोचे अध्यक्ष महेश माळी, सचिव गौरव करवा यांची उपस्थिती होती. या प्रकल्पासाठी रोटरी फाउंडेशनकडून (युएसए) जागतिक अनुदान मंजूर झाले असून, एकूण सुमारे ४० लाख एवढा खर्च या योजनेसाठी




करण्यात येणार आहे. आधुनिक मशिनरी, प्रशिक्षण व्यवस्था आणि श्रमक्षमतेनुसार स्थानिक महिलांना रोजगार देण्याची संधी यामुळे उपलब्ध होणार आहे. प्रकल्पामार्फत शहरातील प्लास्टिक कचऱ्याचे दररोज संकलन करून ते वेगवेगळ्या प्रकारांनुसार वर्गीकृत केले जाणार आहे. त्यानंतर त्याचा पुनर्वापर किंवा पुनरुत्पादनासाठी प्रक्रिया केली

पान ३ वर

# सत्यशोधक विद्यालयात नात पुस्तकांशी हा उपक्रम साजरा

**भोकरदन । प्रतिनिधी -** मानव विकास पुनर्निर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचालित , सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय , गोषेगांव ता. भोकरदन जि. जालना येथे शनिवारी दप्तर मुक्त अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचन क्षमता विकसित व्हावी या दृष्टीने वाचन उपक्रमांतर्गत पुस्तकांशी नातं हा उपक्रम घेण्यात आला.

शिरसगाव मंडप येथील केंद्रप्रमुख दत्ता जिवरग सर, के के बी पब्लिक स्कूल येथील संस्थाचालक ज्ञानेश्वर बकाल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थांमध्ये या बद्दल उत्साह निर्माण झाला आहे. इको क्लब अंतर्गत अनेक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या उपयुक्त असे वृक्ष ,कलम विद्यालयात

पान ३ वर



# मंगलबाई दुधेकर यांचे निधन



**जालना । प्रतिनिधी -** येथील श्रीमती मंगलाबाईं पद्माकर दुधेकर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्यामुळे शुक्रवार (दि २७) रोजी रात्री एक वाजेच्या सुमारास निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर राम तीर्थ स्मशानभुमी जालना येथे दुपारी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. श्रीमती मंगलाबाई दुधेकर यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले, दोन सुना, दोन जावाई, नऊ नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# वीज दर स्वस्त नसुन शॉक आहे




राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीज दर ठरविण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र नियामक आयोगाने निर्णय दिला असून घरगुती-औद्योगिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे.स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी १० टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन याचे स्वागतच.गरीब व सर्वसामान्य ग्राहक घरगुती युनिटचा वापर साधारणतः १०० ते ३०० युनिट पर्यंत होतोच आणि सरकारने ग्राहकांना फक्त १ ते १०० युनिट पर्यंत ५.७४ प्रति युनिट असा दिलासा दिला आहे हे तर असे झाले की उंट के मु मे जीरा त्यामुळे वीज ग्राहकांना दिलासा किंवा स्वस्त म्हणता येणार नसुन याला जोर का झटका म्हणावा लागेल. आज राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्यांचे ७० टक्के सांगितले जात आहे.परंतु माझ्या माहितीनुसार १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्यांचे प्रमाण साधारणतः ३० टक्के पेक्षा कमी असावेत आणि शंभरच्या वर म्हणजे १०० ते ३०० युनिट पर्यंत वापरणाऱ्यांचे प्रमाण ५० टक्के पेक्षा जास्त असावेत कारण यात गरीब व सर्वसाधारण किंवा कामगार वर्ग मोडतो.त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीजेचे जे युनिट दर आणि युनिटची आकडेवारी दिली आहे त्यात बदल करणे गरजेचे आहे.विद्युत नियामक आयोगाने जे १ ते १०० पर्यंत युनिटचे दर ५.७४ लावले आहेत ते दर १ ते ३०० युनिट पर्यंत लावायला पाहिजे होते तेव्हा ग्राहकांना दिलासा मिळेल. कारण साधारणतः १०० युनिटच्या वर सर्वांचाच वापर होतो. करीता वीज दरात ग्राहकांना सरसकट दिलासा हा दिखावा असुन महावितरणने व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेला मोठा शॉक आहे.महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मितीच्या बाबतीत अव्वल आहे.परंतु इतर राज्यांच्या बरोबरीचा विचार केला तर वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रांतील दर जास्त व महागडे आहे ही वीज निर्मिती करणाऱ्या राज्याच्या दृष्टीकोनातून चिंताजनक बाब म्हणावी लागेल.त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आखुण दिलेले वीज दर सर्वसामान्यांना परवडणारे नसल्याने यात बदल करून १ ते ३०० पर्यंत युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांना ५.७४ प्रति युनिट दर लावावा जेणेकरून याचा फायदा गरीब व सर्वसामान्यांना सहज होईल.कारण वाढती महागाई, वीजेचे बिल,घर टॅक्स,पाणी बील,औषधोपचाराचा खर्च इत्यादी अनेक बाबी अल्पशा उत्पन्नात पुर्ण होवू शकत नाही त्यामुळे आपली स्वतःची वीज निर्मिती असल्याने यात गरीब व सर्वसामान्यांना कशा पद्धतीने लाभ देता येईल



यावर सरकारने,महावितरणने व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने गांभीर्याने विचार करावा व ग्राहकांना दिलासा द्यावा हीच अपेक्षा.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# अटकेपार घेऊन जाणारी भाषा...

बोलू मराठीत कौतुके
म्हणून नको गे
हिंदी इंग्रजीचे दुस्वास इतुके...

शालेय शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० शालेय स्तरावर लागू केले. या शैक्षणिक धोरणानुसार अतिशय महत्वाचे सकारात्मक बदल शालेय शैक्षणिक स्तरावर करण्यात आले आहेत. २०२१ पासून या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्याविषयी विविध प्रकारचे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात आले होते. तसेच हळूहळू काही विषयांमध्ये महत्वाचे बदल करत करत संपूर्ण महाराष्ट्रात हा बदल स्वीकारण्याची मानसिकता शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्यात घडून आणली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० भारतातील अनेक राज्यांमध्ये गेले चार वर्षांपासून विविध शैक्षणिक स्तरांवर लागू करून शालेय शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याचे प्रयत्न चालू आहेत. गेली पाच वर्षांपासून शासकीय आणि शाळा स्तरावर याबाबत जनजागृती हर प्रकारे करण्यात येत आहे.

देशातील अनेक राज्यांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आधीच लागू झाले आहे. महाराष्ट्रात हे धोरण लागू करण्यास थोडा उशीरच झाला. 'देर से ही सही पर देर आये दुरुस्त आये' असे म्हणतात. इर्शीशी डरींश ढहरप छर्शींशी असेही म्हणतात. उशिरा का होईना पण सगळ्यांच्या भल्याचे शहाणपण येणे आवश्यक असते. शिक्षण देतांना दूरदृष्टी असावी आणि वर्तमान काळासोबत येणाऱ्या भविष्याचा विचार करून विद्यार्थ्यांचा गुणवत्ता व बौद्धिक विकास झाला पाहिजे. एकाबाजूने गेली २०-२५ वर्षे शैक्षणिक गुणवत्ता कशी घसरत चाललेली आहे. या चर्चा सातत्याने घडून येत आहे आणि दुसऱ्या बाजूने चांगले बदल स्वीकारण्यास अक्षमता दर्शविणे हेही होत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार एकात्मता, क्रियाशीलता, संवादक्षमता, कलात्मकता, शास्त्रीय दृष्टीकोन ठेवून विद्यार्थ्यांचा भावनिक, मानसिक, शारीरिक, बौद्धिक विकास होईल अशा प्रकारचे उपक्रम अभ्यास क्रमात अंतर्भूत केलेले आहेत. त्यासाठी निश्चितपणे शिकविण्याची, अभ्यास करण्याची व गुण संपादन करण्याची पद्धत बदललेली आहे. त्यासाठी शिक्षक, विद्यार्थी व पालक या सगळ्यांनीच नवीन कार्यपद्धती स्वीकारणे आवश्यक आहे. जसे शिक्षकांनी या शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करून त्यामागील उद्दिष्ट्ये व परिणाम जाणून घेतले पाहिजे त्याच प्रमाणे पालकांनी सुद्धा यात लक्ष घालून ही प्रक्रिया आपल्या पाल्याच्या विकासासाठी कशी फायद्याची आहे. हे जाणून घेतले पाहिजे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार बहुभाषीय शिक्षण सुचवले आहे. त्यात प्राथमिक ज्ञान माध्यम मातृभाषा असेल तर मुलभूत संकल्पना सहज समजतात त्यामुळे प्रथम माध्यम मातृभाषा असावी असे सुचविले आहे. त्याबरोबरच आपला देश बहुभाषीक असल्यामुळे आणि शिक्षणाबरोबरच पुढचा विचार करुन भविष्यातील करीयरचा परिघ वाढता आणि मोठा असावा या दृष्टिकोनातून किमान तीन भाषा ज्यात राष्ट्रीय भाषा, अंतरराष्ट्रीय भाषा, प्राचीन भाषा किंवा परदेशी भाषा शिकवावी ( ऑप्शनल ) असे सुचवले आहे.

मागच्या महिन्यात हिंदी पहिलीपासून शिकवावी या विषयाचा शासनाचा जी आर लागू झाला. त्याबद्दल मला आनंदच झाला. कारण हिंदी ही मराठीची बहीणच ! पण मराठी समाजात या निर्णयावर उमटलेले तरंग बघुयात.

गेले काही आठवडे नावाजलेल्या मराठी व्यक्तींनी हिंदी पहिलीपासून शिकविण्याच्या या निर्णयास जो विरोध केला यावरून महाराष्ट्रात हिंदी भाषा किंवा इंग्रजी भाषा व त्यांचे शिक्षण याविषयी किती उदासीनता आहे हे लक्षात आले. अतिशय नावाजलेले स्वतास अभ्यासक किंवा तज्ञ म्हणविणारे सुद्धा केवळ एकच भाषा आणि तीही केवळ मातृभाषाच शिकविणे किती आवश्यक आहे असे विचार मांडत आहेत.

थमी गेली २६ वर्षे महाविद्यालयीन व त्याच बरोबर शालेय शिक्षण क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे मला जे अनुभव आलेले आहेत. त्यानुसार मी इथे मुद्दे मांडत आहेत. - १- भारत हा बहुभाषिक देश आहे. त्यामुळे प्रत्येक शाळेमध्ये विविध मातृभाषा असलेले विद्यार्थी शिक्षण घेतात. तसेच वयाच्या ५-६ व्या वर्षापासून मुलांचा भाषिक विकास अशा पद्धतीने होतो कि विद्यार्थी किमान २ ते ३ भाषा अगदी सहज शिकतात, ज्याचा त्यांना ताण (स्ट्रेस) येत नाही. कारण एकाच इमारतीत मारवाडी, मराठी, हिंदी, कन्नड, गुजराती, पंजाबी बोलणारे शेजारी असतात. मुल स्वताःच्या घरात एक भाषा बोलत असलं तरी मित्रांसोबत वेगळी भाषाही अनुभवत असतं. आपल्याकडे प्रांत बदलला की भाषेतील शब्दसंच, भाषेचे वळण, भाषेची चाल, भाषेचा लहेजा बदलतो. भारतीय वंशाच्या जनुकांमध्येच बहु भाषा शिकण्याची सकारात्मकता नैसर्गिक आहे. २- शिक्षणाच्या दृष्टिकोनातून शहरात 'मातृभाषा' ही संकल्पना आता आकुंचित झाली आहे. आपण मराठी भाषेसाठी राज्यभाषा हा शब्द वापरावा असे मला वाटते. जर घरातही आणि सगळीकडेच ती भाषा बोलली, वाचली व ऐकली जात असेल तर तीस राज्यभाषा म्हणावे. राज्यभाषेतून प्राथमिक शिक्षण सोपे होते. मराठी माध्यम शाळेत मराठी भाषाच प्रथम भाषा आहे. इंग्लिश माध्यम शाळांत प्रथम भाषा इंग्लिश आहे. कोणत्या माध्यमाची शाळा निवडावी हे पालकांच्या इच्छेवर अवलंबून आहे.

३- इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्राथमिक स्तरावर शिक्षक विज्ञान, भूगोल, गणित असे विषय शिकवितात तेंव्हा त्यांना किमान दोन ते तीन भाषांमध्ये ( इंग्लिश, हिंदी, मराठी ) विषय समजून सांगावा लागतो. सर्रास सहज वापरली जाणारी ही पद्धत झाली आहे.

४- हिंदी भाषा पहिली पासून महाराष्ट्रात शिकवली जाऊ नये असा टोकाचा विचार करणारी एक लाट सध्या बघायला मिळत आहे. प्राथमिक शिक्षण हा माणसाच्या आयुष्यातील सर्वात महत्वाचा टप्पा आहे आणि भविष्यातील सर्व प्रकारच्या नोकरी, व्यवसाय, करियर संधींचा तोच पाया आहे. प्राथमिक शिक्षणाचे वय म्हणजे साधारण ६ ते १० वर्ष ज्यामध्ये अतिशय उच्चतम बौद्धिक विकास क्षमता असते. या वयात सहज शिक्षण पद्धतीने आनंदनिर्मितीतून आणि प्रेमळसहवासातून विद्यार्थ्यांना सोप्पी वाटणारी आणि त्यासोबत पाठ्यपुस्तकात असलेल्या भाषेतूनच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवता येते.

भाषा शिक्षण क्षमता विकास या वयात अतिशय आवश्यक ठरतो. आणि तो वेगाने होत असतो. मराठी व्यतिरिक्त हिंदी किंवा इंग्लिश भाषा शिकवू नये हा केवळ महाराष्ट्रीय अस्मितेचा विषय म्हणून याकडे बघू नये. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून हे विषय त्यांना शिकविले गेले पाहिजे. काही उदाहरणे आपण बघूया...

या वयात छोटी मुले घरोघरी जे कार्टून चॅनल्स बघतात त्यातील हिंदी भाषा अतिशय वाईट आहे. ती भाषा योग्य नाही. हे कळण्यासाठी योग्य भाषा कोणती हे शिकवलेच पाहिजे.

मुलांचे सवंगडी बहुभाषीक असतात. त्यामुळे बोलीभाषा सहज शिकली जाते.

संस्कृत भाषा वर्षानुवर्षे काही ठराविक वर्गातील कुटुंबात घरीच शिकविली जात होती. त्यामध्ये श्लोक पाठांतर किंवा संस्कृत ग्रंथांचे पारायण वैगरे उपक्रमांतून सहज संस्कृत भाषा शिकली जात होती. याचा फायदा उच्चार सुधारणे, उच्चतम दर्जेदार शब्दसंग्रह वाढणे, मौलिक ज्ञान मिळणे वगैरे आहे. मग ज्यांनी संस्कृत भाषा सहजच अशा घरगुती किंवा जमातीतील उपक्रमांतर्गत शिकून त्यात नैपुण्य मिळविले, त्यात त्यांचे नुकसान काय झाले ? उलट फायदेच झाले. मग हिंदी किंवा इंग्लिश भाषा शिकण्याचे फायदे विद्यार्थ्यांना का नाही मिळू शकणार ? उलट नुकसान नव्हे तर फायदेच होणार.

उच्च शिक्षित सुप्रसिद्ध विदुषी असलेल्या गणिताच्या प्राध्यापक बाईंनी पाच वर्षांपूर्वी एक मुद्दा चर्चेत आणला होता की मराठी भाषेतील विशेषत: अंक गणितातील जोड शब्द मुलांना शिकवू नये कारण उच्चारायला व लिहायला ते अवघड जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांची गणितातील रुची कमी होते. ज्यात त्यांनी उदाहरणे दिली होती. सत्तावीस, त्रेहात्तर, सत्यांशी, नव्याण्णव, अठ्ठ्यात्तर असे अनेक अंक गणितातील शब्द काढून टाकावेत असे त्यांचे म्हणणे होते. त्याऐवजी दोनावर सात, सातावर तीन, आठावर सात, नवावर नऊ, सातावर आठ असे शब्द वापरावे असे त्यांनी सुचविले होते. यामागे त्यांचा हेतू हा होता की भाषा सोप्पी करून विषय शिकवावा. मला हा मुद्दाच अतिशय चुकीचा वाटतो. भाषा कोणतीही असो. त्यात जोड शब्द महत्वाचे असतात आणि ते शिकविलेच पाहिजे हे मला वैयक्तिक वाटते. आपली भाषा जोडशब्दयुक्त आहे. ती तशीच शिकवावी लागते. मुलभूत शिक्षणासाठी लघुपथ ( शॉर्टकट ) नसतो.

वयाने लहान विद्यार्थी भाषा सर्व प्रथम घरांतून शिकतात. घरातील कुटुंबिय शुद्ध भाषा बोलतात का ? बरयाच कुटुंबात शुद्ध किंवा योग्य भाषा बोलली जात नाही म्हणून ते योग्य भाषा शिक्षणासाठी शाळेवर अवलंबून असतात. आजच्या काळात दोन्ही पालक नोकरी व्यवसायात व्यस्त असल्यामुळे विद्यार्थी अडीच तीन वर्षांपासूनच घराच्या बाहेर पडतात. असे विद्यार्थी मिळेल त्या सहवासातून अनौपचारिक रित्या भाषा शिकतात. त्यामुळे औपचारिक शिक्षण सुरु होते तेंव्हा उच्चस्तरीय भाषेचे मुलभूत शिक्षण सुरुवातीपासून देणे आवश्यक आहे. मी स्वतः कन्नड मातृभाषा असणाऱ्या कुटुंबात वाढले. सात ते आठ वर्षांची असेपर्यंत मला कन्नड व्यतिरिक्त एकही दुसरी भाषा बोलता येत नव्हती. परंतु नोकरी निमित्त गाव बदलल्यामुळे माझ्या वडीलांनी मला मराठी माध्यम शाळेत घातले. आणि कदाचित सहा महिने ते एक वर्षात मी बर्यापैकी मराठी बोलू, लिहू लागले. कारण घरा व्यतिरिक्त (घरात आई कन्नड बोलत असे व वडील मराठी ) त्या गावात, शाळेत, शेजारी व पाठ्यक्रमिक पुस्तकात सगळीकडे मराठीचाच सहवास होता.

कोणतीही भाषा शिकल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत नाही. तसेच भाषा शिक्षण तणाव निर्माण करत नाही उलट ते आनंदीदायीच असते आणि भारतीय वंशाच्या जनुकामध्येच बहुभाषीक शिक्षणाची ओढ आहे हे जाणून घेऊन मराठी सोबत हिंदी, इंग्लिश, संस्कृत अशा भाषा शिकवू नये हा मुद्दा चुकीचा आहे.

५- शालेय शिक्षणानंतर पुढची पायरी येते ती महाविद्यालयीन शिक्षणाची. विद्यापीठीय पदविका किंवा पदवी असे स्तर येतात. या स्तरावर सगळे शिक्षण मातृभाषेतूनच दिले जाते का? तर नाही. मी पंधरा वर्ष इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांना कम्युनिकेशन स्किल्स, लिटररी इंग्लिश आणि प्रॅक्टिकल इंग्लिश असे विषय शिकविले आहेत. त्यामुळे इंग्रजी भाषेचे ज्ञान नसेल तर विद्यार्थ्यांचे शिक्षण कसे खंडित होते किंवा शिक्षणात अपयश कसे येते हे मी अनेक वर्षे पाहिलेले आहे. इंजिनीअरिंग, मेडिकल, फार्मसी, लॉ, मास कम्युनिकेशन, लिबरल आर्ट्स, ग्राफिक्स डिझाईन, जर्नालिझम असे अनेक विद्यापीठीय कोर्सेस इंग्रजी माध्यमातून उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील जास्तीतजास्त विद्यार्थी अशा प्रकारचे शिक्षण घेतात कारण या शिक्षणानंतर त्यांना नोकरी व व्यवसायाच्या अधिकाअधिक संधी उपलब्ध असतात. महाराष्ट्रात केवळ मराठी भाषेच्या आधारावर अशा प्रकारच्या नोकरी व व्यवसायाच्या किती संधी युवकांसाठी उपलब्ध आहेत ? याचा विचार व्हायला हवा. काम करताना सहकाऱ्यांशी बोली भाषा वापरणं आणि कामाचे रिपोर्ट्स तयार करताना इंग्लिश भाषा वापरावी लागणं हे सत्य परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे.



तात्पर्य असे की मराठीत शिक्षण हवेच पण त्याबरोबरीने हिंदी, इंग्लिश भाषाही प्राथमिक शिक्षणात शिकवल्या जाव्यात.

**विजयालक्ष्मी मणेरीकर**
**मो. ९८२२६८३७९९**
**संचालक, ग्लोबल व्हिजन स्कूल, अंबड, नाशिक**

# अशाने सुखाचे दिवस कसे येतील?

आजकाल प्रत्येकालाच वाटत आहे की, माझ्या जीवनात चांगले व भरभराटीचे दिवस यावेत. आयुष्यात सुखाचे व आनंदाचे क्षण यावेत, म्हणून प्रत्येकजण चांगले व सुखाचे दिवस येण्यासाठी धडपडताना दिसत आहे. जीवनात सुखाचे व आनंदाचे दिवस येण्यासाठी दिवसरात्र स्वप्न पाहत आहे.पण त्याच्या जीवनात काही केल्या सुखाचे दिवस येत नाहीत. कारण ते कधी चांगले व निर्मळ कर्म करतच नाहीत. नेहमी वाईट कर्म करतात आणि सुखाचे दिवस येण्याचे स्वप्न पाहतात. मग अशाने जीवनात चांगले व सुखाचे दिवस कसे येतील हो? आपल्या जीवनातील दुःखाचा काळोख दूर होऊन सुखाचा प्रकाश कधी पडेल हो? जीवनात सुखाचे दिवस येण्यासाठी चांगले कर्म करावे लागतात. गरजू लोकांना शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी लागते. दुःखी व पीडित लोकांना मायेचा आधार द्यावा लागतो. संकटात सापडलेल्या व्यक्तीला निस्वार्थ भावनेने मदत करावी लागते. दारावर आलेल्या भिकाऱ्याला सढळ हाताने दानधर्म करावा लागतो. सामाजिक व वैवाहिक कार्यात हिरीरीने भाग घ्यावा लागतो. आश्रमातील अनाथांना व वृद्धांना कपडे, अन्न व इतर भेटवस्तू दान कराव्या लागतात. वृद्ध आई-वडिलांची जिवापाड काळजी घ्यावी लागते. म्हातारपणात त्यांना मायेचा आधार द्यावा लागतो. दुःखी व पीडित लोकांचे अश्रू पुसावे लागतात. तेव्हा कुठे आपल्या जीवनात सुखाचे व आनंदाचे दिवस येऊ लागतात. हे अगोदर सगळ्यांनी लक्षात घेतले पाहिजे आणि त्यासाठी प्रत्येकाने मनावर घेऊन चांगले कर्म करण्यासाठी पुढील वाटचाल केली पाहिजे. पण आपल्याला चांगले कर्म न करताच जीवनात सुखाचे व आनंदाचे दिवस यावे वाटत असतील तर ते साफ चुकीचे आहे. सांगायचा मुद्दा म्हणजे आपल्याला आजकाल असे वाटत आहे की, जीवनात सर्व भौतिक सुखसुविधा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात, माझ्याकडे भरपूर संपत्ती व पैसा असावा, माझ्याकडे आलिशान गाडी व आलिशान बंगला असावा, माझ्याकडे भरपूर जमीन व शेती असावी, माझा मुलगा मोठ्या पदावर अधिकारी म्हणून रुजू व्हावा, मला शासनाच्या सर्व स्कीम व योजनांचा लाभ मिळावा, माझ्या घरात कधीच भांडण तंटे होऊ नयेत,

माझ्या घरात कधीच अठरा विश्व दारिद्र्याचा काळोख पसरू नये, माझ्या परिवाराने कायम सुखी व आनंदी जीवन जगावे. माझ्या संसारात कधीच कशाची कमतरता भासू नये आणि माझ्या संसाराला कोणाची नजर लागू नये. आमच्या संसाराचा गाडा एकदम सुरळीत चालावा, माझे नाव चांगल्या व प्रतिष्ठित लोकांच्या यादीत झळकावे, माझा मुलगा भविष्यात डॉक्टर किंवा अभियंता व्हावा म्हणजे आमचे घर खूप श्रीमंत होईल आणि आम्हाला सुखाचे दिवस येतील, असे बहुतांश पालकांना वाटत असते. मला सुखाचे दिवस यावेत आणि इतरांना वाईट दिवस यावेत, म्हणून आजकालचा माणूस खूप प्रयत्न करताना दिसत आहे. त्यासाठी झटपट श्रीमंत होऊन जीवनात चांगले दिवस येण्याचे स्वप्न पाहत आहे. नको त्या मार्गाने पैसा मिळवून जीवनात चांगले दिवस यावे म्हणून अटोकाट प्रयत्न करत आहे. पण त्यासाठी माणूस झटपट श्रीमंत होऊन चांगले दिवस येण्यासाठी कोणत्याही थराला जाऊन नको ते वाईट कृत्य करत आहे. वाईट व अनैतिक मार्गाने भरपूर पैसा मिळवत आहे आणि झटपट श्रीमंत होत आहे.काहीजण दारू व गांजा विकून भरपूर पैसा कमावतात. काहीजण दुसऱ्यांना फसवून किंवा लुबाडून भरपूर पैसा कमावतात, काहीजण पैशासाठी दुसऱ्याची सुपारी घेऊन तिसऱ्याला ठार मारतात तर काहीजण चोरी व डाका घालून मायंदळ पैसा कमावतात व एका रात्रीत भरपूर श्रीमंत होतात आणि गडगंज संपत्तीचे मालक होऊन बसतात. म्हणजे आजकाल दोन नंबरच्या व्यवसायाचा अवलंब करून माणूस पैसा कमावताना दिसत आहे आणि चांगले दिवस येण्याचे स्वप्न पाहत आहे. नंबर दोनच्या धंद्यात माणसाला भरपूर पैसा व संपत्ती मिळवता येते पण माणसाला सुख व समाधान कधीच लाभत नाही. हरामीचा पैसा माणसाला कधीच पचत नाही. माणसाला संध्याकाळी सुखाची झोप सुद्धा लागत नाही. दोन नंबरच्या धंद्यात भलेही पैसा भरपूर कमावता येतो पण आलेला पैसा कोणत्या मार्गाने जातो हे आपल्याला सुद्धा कळत नाही. पैसा एका मार्गाने येतो आणि नकळत दुसऱ्या मार्गाने निघून जातो. शेवटी माणसाला भिकारी व दरिद्री बनवतो. त्या माणसाच्या घरात कधीच सुखशांती नांदत नाही. त्याच्या घरातील सदस्य नेहमी आजारी पडतात. त्याच्या घरात नेहमी भांडण तंटे होतात. त्या माणसाच्या मागे नेहमी कोर्ट कचेरीच्या वाऱ्या लागलेल्या असतात. त्या माणसाचे व त्याच्या पत्नीचे घरात नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने वादविवाद होतात. तसेच त्याच्या मुलाचे व सुनंचे नेहमी शुल्लक कारणावरून घरात भांडण होते. त्याच्या मुलाची बायको घरात नांदायला सुद्धा तयार नसते. म्हणून नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने तो माणूस दुःखी व असमाधानी होतो. असा दुसऱ्यांचा तळतळाट घेऊ पाहणाऱ्या माणसांच्या जीवनात सुखाचे दिवस कसे काय येतील? त्यांच्या जीवनात सुखाचे व आनंदाचे क्षण कधीच येणार नाहीत. तुमचे कर्मच चांगले नसतील तर तुम्ही सुखाची अपेक्षा का ठेवायची? तुम्ही जर दुसऱ्यांचा तळतळाट घेऊन भरपूर पैसा व संपत्ती मिळवत असाल तर तुम्ही सुखी जीवन कधीच जगू शकणार नाही. तुमच्या जीवनात सुखाचे व आनंदाचे क्षण कधीच येणे शक्य नाही. माणसाकडे पैसा असला म्हणजे माणूस सुखी असेलच असे नाही. माणसाकडे आलिशान गाडी व आलिशान बंगला आहे आणि भरपूर संपत्ती व पैसा आहे, पण त्याचे कर्मच चांगले नसतील, त्याची वर्तणूक चांगली नसेल, तो नेहमी दुसऱ्यांना फसवत असेल आणि चोरी व डाका घालून भरपूर पैसा मिळवत असेल तर त्याच्या जीवनात सुखाचा पाऊस कधीच पडत नाही. त्याच्या जीवनात नेहमी दुःखाचा पाऊस पडतो आणि त्याच्या घरात सुखाचा जराही प्रकाश नसतो. काहीजण दुसऱ्यांचे भांडण लावून देण्यात फार पटाईत असतात. दुसऱ्याचे भांडण लावून देणे आणि आपण बघ्याची भूमिका घेणे हे आजकालच्या बहुतांश लोकांचे वाईट धोरण झाले आहे. अशा लोकांची गर्दी आता प्रत्येक क्षेत्रात वाढत चालली आहे. त्यांचे कर्म खरोखरच खूप खराब व बेकार असतात. त्यांना दुसऱ्यांचे काहीही बघवत नाही. दुसऱ्यांचा चांगुलपणा त्यांच्या डोळ्यात सारखा सलत असतो. ते नेहमी दुसऱ्यांचा वाईट विचार करतात आणि दुसऱ्यांचे वाटोळे करण्याचा प्रयत्न करतात. पुढे जाणाऱ्या व्यक्तीला जाणीवपूर्वक मागे खेचतात. अशा लोकांची संख्या आता प्रत्येक गावात व समाजात वाढली आहे. अशा वाईट वृत्तीच्या माणसांची संख्या समाजात कमी होणे हल्ली नितांत गरजेचे आहे. अशा लोकांमुळे समाजाची बेकारी होत आहे. ही माणसे स्वतः व्यसनी व दारुडे तर असतातच आणि दुसऱ्याला पण व्यसनाच्या विखारी विळख्यात ओढतात. काही तरुण मुले असेही असतात की, ते हुशार विद्यार्थ्याला घडवण्याऐवजी जाणीवपूर्वक बिघडवण्याचा प्रयत्न करतात. त्याला वाईट व्यसनाच्या फंदात पाडतात आणि स्वतःच्या बरोबरीला आणून ठेवतात. चांगल्या व होतकरू विद्यार्थ्याला वाईट मार्गाला लावून त्याचे शैक्षणिक जीवन बरबाद करतात.असे अनेक विद्यार्थी मी कॉलेज जीवनात पाहिले आहेत. त्या विद्यार्थ्यांनी कित्येक सुसंस्कारी व हुशार विद्यार्थ्यांना व्यसनाच्या विखारी विळख्यात ओढून त्यांचे शैक्षणिक करिअर बरबाद केले आहे. दुसऱ्याचे करिअर बरबाद करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य खरंच चांगले असेल का? त्यांच्या जीवनात यशाची व सुखाची मंगलमय पहाट उगवेल का? दुसऱ्याचे वाटोळे करणाऱ्या विद्यार्थ्याचे भविष्य खरंच उज्ज्वल असेल का? सध्या सरकारच्या अधिपत्याखाली असणारी शासकीय यंत्रणा गोरगरीब, वंचित व तळागाळातील लोकांसाठी आलेला पैसा जनतेला न देता स्वतःची तिजोरी भरत आहे आणि जनतेला थोडेफार पैसे देऊन खुश करत आहे. हे शासकीय कर्मचारी भ्रष्टाचार करण्यात आघाडीवर असतात. अशिक्षित लोकांची शासकीय कामाच्या नावाखाली आर्थिक पिळवणूक करतात. काही शासकीय कर्मचारी प्रामाणिकपणे व इमानेइतबारे चांगले काम करतात.त्यांना गरिबीची थोडीफार जाणीव असते. हे कर्मचारी गोरगरिब जनतेची दखल घेऊन काम करतात. शासनाने दिलेला निधी जनतेला प्रामाणिकपणे वाटप करतात. ते कसलाच भ्रष्टाचार करत नाहीत. त्यांचे कर्म अतिशय चांगले व नितळ असतात. म्हणून अशा चांगल्या लोकांच्या जीवनात नक्कीच सुखाचे दिवस येतात. म्हणून प्रत्येकाने जीवनात किमान थोडे तरी चांगले कर्म करावे.

दुसऱ्याचे वाईट करण्यापेक्षा दुसऱ्याचे चांगले करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा. सामाजिक बांधिलकी म्हणून समाजकार्य करत रहा... गरजवंताला, दुःखी व पिडीतांना तसेच वृद्ध आई-वडिलांना मायेचा आधार द्या... दुसऱ्याचे वाटोळे करण्याचा प्रयत्न करू नका... इतरांबद्दल वाईट चिंतन करू नका...मोकळ्या मनाने व सढळ हाताने आर्थिक मदत करत चला... आपलेच भले व्हावे आणि इतरांची वाटोळे व्हावे हा विषय मनातून काढून टाका... दुसऱ्याचे चांगले नाही करता आले तरी चालेल पण वाईट करण्याचा प्रयत्न चुकूनही करू नका... कारण तुमचे कर्म जर चांगले असतील तर नक्कीच तुमच्या जीवनात सुखाचे व आनंदाचे दिवस येतील... पण तुमचे कर्मच वाईट असतील तर मग तुमच्या जीवनात सुखाचे दिवस कसे येतील?

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर**
**जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

युवा आदर्श

**उद्युक्त ...**

जिल्हा जणूं नागीण
मनास करते उद्युक्त
खात राहतो सतत
अन्न ना जे उपयुक्त
व्यंजने दिसे चटपटी
भूकाग्नि हो प्रदिप्त
यज्ञ कर्म फक्त नावा
उदरभरण रे अनुरक्त
भूक कधीचं पळाली
घांस तरी अतिरिक्त
पचन संस्था कंटाळे
गोदाम नसते रिक्त
फास्ट फूड लुभावते
घातक रे अत्यासक्त
एकीकडे उदंड अन्न
दुसरीकडे ते अभुक्त
खाणे म्हणजे भरणे
विचार विचित्र अयुक्त
जिभेवर नियंत्रणार्थ
स्व नियंत्रण नियुक्त
व्यंजने अत्याकर्षक
कुणीही होईल उद्युक्त
देशात अनंत उपाशी
किती तरी एक भुक्त
आवश्यक तेचं खाई
सहज हो चिंता मुक्त
गोड तरी घातकअसे
खाद्यअतिशर्करायुक्त

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# परतूर तालुक्यासह धरती आबा जनभागीदारी अभियान

**परतूर । प्रतिनिधी -** धरती आबा जन भागीदारी अभियान अंतर्गत अनुक्रमांक ०१ ते २१ या मुद्द्याची माहिती १. कुटुंब प्रमुखाचे नाव २. कुटुंबातील एकूण सदस्य संख्या ३. आधार कार्ड ४. आयुष्यमान भारत कार्ड, ५. जातीचा दाखला ६. किसान क्रेडिट कार्ड ७ पी. एम. जनधन योजना ८ पी.एम. जीवन ज्योत विमा योजना ९ पी. एम. पीएम मातृत्व वंदन योजना ११ पी.एम. उज्वला योजना१२ पी.एम. विश्वकर्मा१३ राशन कार्ड१४ शिकेल रेट तपासणी १५ आदिवासी प्रम ाणपत्र १६ मनरेगा जॉबकार्ड१७ मिशन इंद्रधनुष्य १८ मुद्रा योजना १९ पोषण विकास २० जिवंत सातबारा योजना २१ लाभार्थ्याची सही जनजागृती व लाभ संपुष्टता शिबिर या अंतर्गत मौजे पाडळी या ठिकाणी दिनांक २७.०६.२०२५ रोजी सर्वे करण्यात आला यावेळी श्रीमती यु. एन. चाळणेवाड, मंडळ अधिकारी सातोना खुर्द, गोपाल कुटे , गिरीश पेटकर, महसूल सहाय्यक, सुवर्णा चाटे, ग्रामसेवक, कृष्णा सोनवणे महसूल सेवक, प्रसाद नामदेव काकडे सरपंच, मिठाबाई शाम राव काळे, भगवानराव मोटे, राम ठोके, सुरूलाल काळे, संदीप मस्के, रमेश काकडे, उपस्थित होते.



## गाडेगव्हाण येथील शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ न भरल्यास ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील गाडेगव्हाण जिल्हा परिषद शाळेत गेल्या १५ दिवसापासून शिक्षकांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे जर एका आठवड्यात सदर पदे भरली नाहीत तर जिल्हा परिषद जालना या ठिकाणी विद्यार्थी घेऊन 'शाळा भरो' आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे
याबाबत सविस्तर असे की, गाडेगव्हाण जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते पाचवा वर्ग असून ५० ते ५५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत परंतु या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शाळेत केवळ एकच च शिक्षक कार्यरत आहेत शाळेतील मुख्याध्यापक मुलाना शिकवत आहे यांची तक्रारीने प्रतिनियुक्ती करण्यात आलेली आहे गेल्या तीन वर्षांपासून त्यांच्या जागेवर अद्याप पर्यंत पद शिक्षकाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून जागा रिक्त आहे गेल्या आठ दिवसापासून रिक्त आहे एकीकडे जिल्हा परिषदेच्या शाळा विद्यार्थ्यांविना शेवटच्या घटका मोजत असताना गाडेगव्हाण ग्रामस्थांचा शाळेवरील विश्वास व येथील कार्यरत उपक्रमशील शिक्षकांमुळे शाळेत पन्नास ते पचावन विद्यार्थी शिक्षणाचे धडे आजही गिरवत आहे त परंतु शिक्षकांची पदे रिक्त राहिल्यास त्याचा विद्यार्थी संख्येवर व गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊ शकतो त्यामुळे रिक्त शिक्षकांची पदे त्वरित भरावीत अन्यथा तिव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे गटशिक्षणाधिकारी जाफ्राबाद आहे
याकडे वरिष्ठ अधिकारी कार्यकारी मुख्याधिकारी व जालना शिक्षण विभागाने लक्ष देऊन रिक्त जागा भरावी अशी मागणी अशी मागणी जोर धरत आहे.

## बी.पी, शुगर होईल कमी वेळेत घ्या उपचार - डॉ. परीक्षित देशपांडे



**जालना । प्रतिनिधी -** सावित्रीबाई फुले म हिला एकात्म समाज मंडळ संचलित डॉ.के.ब. हेडगेवार चल चिकित्सालय यांच्या संयुक्त विद्यम ाने शहरातील पावरलूम येथे आरोग्य शिबिराला प्रतिसाद मिळाला. यावेळी उपस्थित रूग्णांना डॉ. परीक्षित देशपांडे यांनी बीपी, शुगर, बेसिक आरोग्याची काळजी कशी घ्यावी या विषयी माहिती दिली. तसेच डॉ. दिनेश जोशी यांनी उपस्थित रुग्णांना दैनंदिन जिवन चक्र कसे असावे या बद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अमित हजारे यांनी केले, तर सूत्रसंचालन राजू वाघमारे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभार विजयमाला रौंदळे यांनी मानले, यावेळी रावसाहेब खुपसे, यांच्यासह ग्रामस्थांनी उपस्थीती लावली.

**पान १ वरुन**

### रोटरी रेनबोचा ...

जाणार आहे. पर्यावरण संरक्षणासोबतच यामुळे जालन्यातील कचऱ्याच्या समस्येला शाश्वत उपाय मिळणार आहे. रोटरीच्या या उपक्रमामुळे स्वच्छ भारत मिशन, प्लास्टिक मुक्त भारत, आणि स्थायी विकास लक्ष्यांशी सुसंगत असा एक प्रेरणादायी प्रयोग जालन्यात साकार होत आहे. स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधून हा प्रकल्प शहराच्या विविध भागांमध्ये विस्तारण्याचीही योजना आहे.

उद्घाटनपर भाषणात प्रांतपाल डॉ. सुरेश साबू म्हणाले की, रोटरीने सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून पर्यावरण रक्षणासाठी आदर्श प्रकल्प हाती घेतला आहे. डेविड साउथवर्थ यांनी जालना आणि युनायटेड किंगडममधील क्लबच्या भागीदारीचे हे मॉडेल इतर शहरांनाही प्रेरणा देईल, असा विश्वास व्यक्त केला. अनुप करवा म्हणाले की, या प्रकल्पामुळे कचऱ्याचे व्यवस्थापन शास्त्रशुद्ध होणार असून, स्थानिक रोजगारालाही चालना मिळणार आहे. प्रास्ताविकपर भाषणात महेश माळी म्हणाले की, हा प्रकल्प म्हणजे केवळ प्लास्टिक निर्मूलन नव्हे, तर समाज परिवर्तनाची दिशा आहे. नागरिकांनी यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

या प्रकल्पासाठी प्रयत्न करणाऱ्या सदस्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ रोटरियन वेणुगोपाल राव, शरद लाहोटी, प्रमोद झांजरी, सहाय्यक प्रांतपाल किशोर देशपांडे, संजय राठी, निर्मला साबू, रोटरी रेनबोच्या नियोजित अध्यक्ष डॉ. प्रतिभा श्रीपत, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया, रोटरी इलाईट क्लबचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, डॉ. आरती मंत्री, डॉ. दीपक मंत्री, शंभर रुपये सोशल क्लबचे उदय शिंदे, सपना गोयल, सृष्टी फाउंडेशनचे संजय देशपांडे, डॉ. विजय जेथलिया, विवेक मणियार, नितीन खंडेलवाल, जयेश पहाडे, केतन शहा, सुयोग सावजी, डॉ. प्रशांत पळनीटकर यांच्यासह रोटरी परिवारातील सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शेवटी उपस्थितांचे आभार सचिव गौरव कारवा यांनी मानले.

### सत्यशोधक विद्यालयात ...

आणले आणि विद्यार्थ्यांसहित पालकांच्या हस्ते एक पेड माँ के नाम वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे क्रिकेट, कबड्डी खेळ घेण्यात आले. या उपक्रमासाठी संस्थाचालक तथा प्राचार्य सुनील वाकेकर आणि सचिव श्रीमती जयश्री बनकर यांच्या म ार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. विद्यार्थी व सर्व शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी उपस्थित होते.



# संविधान हत्या दिवस साजरा कराल तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडू

## सामाजिक कार्यकर्ते अॅड. शिवाजीराव आदमाने यांचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** भाजपने २५ जून हा संविधान हत्या दिवस म्हणून साजरा करायला सुरुवात केली आहे. त्यानिमित्ताने शासकीय कार्यालयात देखील तसे फलक लावण्यात आले आहेत. यावर सामाजिक कार्यकर्ते अॅड. महेश धन्नावत यांनी आक्षेप घेतल्यानंतर शुक्रवार दि. २७ जून २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता सामाजिक कार्यकर्ते अॅड. शिवाजीराव आदमाने यांच्यासह काही वकीलांनी देखील आक्षेप नोंदविला आहे. जर संविधान हत्या दिवस साजरा कराल तर तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडू असा इशारा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात देण्यात आलाय.

जालन्यात वकीलांनी संविधान हत्या दिवस साजरा करण्याला आक्षेप भारतीय संविधान अस्तित्वात आहे. त्यामुळेच लोकशाही असलेला देश संपूर्ण जगात प्रसिध्द आहे. त्याचा भारतीय नागरिकांना त्याचा अभिमान आहे

दि. २६ जानेवारी १९५० रोजी संविधान स्विकारल्या पासुन सर्व देश हा संविधानाप्रमाणे चाललेला आहे व भारतीय संविधान हे एक पुस्तक नसून पवित्र ग्रंथ आहे. त्यामुळे सर्व भारतीयांच्या मनात संविधानाचे स्थान आहे. असे असतानाही दि २५ जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान हत्या दिवस २०२५ या फलक लावण्यात आला. हा प्रकार भारतीय नागरीकांची दिशाभूल करणारा, संतापजनक आणि भावना दुखविणारा आहे. भारतीय संविधान हत्या म्हणजे भारतीय संविधान संपले आहे असा त्याचा सरळ अर्थ आहे. हत्या झाल्यानंतर कोणतीही वस्तु शिल्लक राहत नाही. किंवा अस्तित्व राहत नाही आणि असे असेल तर संविधानाची हत्या कोणी केली? त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली? असे



प्रश्न भारतीय नागरीकाना पडणे स्वभावीक आहे. संविधानाची हत्या झाल्या पासून भारत देशाचा कारभार मागील ५० वर्षापासून कसा चालत आहे? अस सवाल वकीलांनी दिलेल्या निवेदनात करण्यात आलाय.

या पूढे अशा फलकासह कोणत्या ही प्रकारचा संविधान हत्या दिवस साजरा करण्यात येऊ नये, नसता पुढील भारतीय पिढीवर त्याचे दुष्परिणाम होतील. त्यामुळे संविधान हत्या दिवसाचे फलक लावल्यास तिव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशारा निवेदनात देण्यात आला. यावेळी अॅड. मा.नि. बनसोडे, अॅड. शिवाजीराव आदमाने, अॅड. महेश धन्नावत, हरिनारायण जैस्वाल, अॅड. वैभव खरात, अॅड. सागर बनसोडे, अॅड. शुभम भारुका, अॅड. व्हि. एल.पांडव, अॅड. सुभाष बोर्डे यांची उपस्थिती होती.

# ध्येयाने प्रेरीत झाल्यास यशाचे शिखर गाठता येते - के. डी. दांडगे



**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने व उद्योग विकास विभाग यांच्या सहकार्याने यशस्वी उद्योजक संतोष रासवे यांनी आराध्य फ्लोअर मिल फेस नंबर ३,प्लाट नंबर ३६ एमआयडीसी जालना येथे ही कंपनी सुरू केली. त्याना वेळोवेळी के डी दांडगे जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन जालना यांचे मार्गदर्शन लाभले .आज दि.२७ जुन २०२५ रोजी श्री दांडगे यांनी या मिलला सदिच्छा भेट देउन संचालक व कामगार यांच्याशी कामकाजा विषयी सविस्तर चर्चा केली. कंपनी चांगली प्रगती पथावर सुरू आहे असे दिसून आले .या वेळी संचालक संतोष रासवे , प्रदीप रासवे, प्रथमेश रासवे,मंजा गोरे,गणेश म्हस्के व आकाश शिंदे यांची उपस्थिती होती.नव उद्योजकांना व्यवसाय उभारणीसाठी, व्यवसाय वाढीसाठी ,गुणवत्ता व दर्जा टिकवणे , उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निम शासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन द्वारा पत्रकार भवन , एस पी ऑफीस समोर जालना मो.९४२३७३०९३२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.